# आठवणी ४० वर्षांपूर्वीच्या

'रंगदीप २०१८'च्या दिवाळी अंकाच्या आवाहनात 'चाळीशी'/'चाळीस' हे सूत्र पाहिलं आणि चाळीस वर्षांपूर्वीची, म्हणजे माझ्या लहानपणची दिवाळी, त्या वेळचे लहान मुलांचे दिवाळी अंक आणि मासिकं यांची प्रकर्षाने आठवण आली. प्रत्येक दिवाळीत आम्ही मैत्रिणी ठरवून वेगवेगळे दिवाळी अंक घ्यायचो आणि आपापले अंक वाचून झाल्यावर मग त्यांची देवाण-घेवाण करायचो.

लहानपणी नियमितपणे वाचलेल्या अंकांपैकी दोन मुख्य अंक होते 'किशोर' आणि 'चांदोबा'. 'किशोर'ची तर वर्गणीच भरलेली असल्यामुळे तो अंक दर महिन्याला पोस्टाने घरीच यायचा. दर महिन्याला सुरुवातीला मी, बहीण आणि बिल्डिंगमधल्या मैत्रिणीदेखील आतुरतेने 'किशोर'ची वाट पहायचो. 'चांदोबा' आणि इतर अंक विकत घेऊन किंवा लायब्ररीतून आणून किंवा मैत्रिणींकडून घेऊन वाचले जायचे. २०१७ सालाच्या शेवटी 'किशोर' आणि 'चांदोबा'चे ऑनलाईन अंक पाहिले आणि अगदी अनपेक्षितपणे जुने बालमित्र भेटावे तसा आनंद झाला !!

तसं २००७ मध्ये 'जिओडेसिक' ह्या कंपनीने 'चंदामामा' विकत घेतल्यानंतर काही वर्षं 'चंदामामा'/'चांदोबा'चे इंग्रजी, मराठीसकट वेगवेगळ्या भाषांतले सगळेच्या सगळे अंक ऑनलाईन उपलब्ध होते. मला साधारणपणे २०१० मध्ये ते ऑनलाईन सापडले. तेव्हा माझी मुलंसुध्दा नुकतीच 'चांदोबा'च्या वयाच्या पुढे गेली होती, पण त्यांतल्या काही गोष्टी, चित्रं, त्या काळच्या जाहिराती वगैरे पाहून स्मरणरंजनाचा आनंद नक्कीच झाला. दुर्दैवाने २०१३च्या दरम्यान 'जिओडेसिक' कंपनी आणि पर्यायाने 'चंदामामा'/'चांदोबा' बंद पडल्यावर ती वेबसाईट आणि अंक इंटरनेटवरून नाहीसे झाले आणि मला हळहळायला झालं. 'चंदामामा'च्या काही चाहत्यांनी आता परत काही अंक वर ऑनलाईन टाकले आहेत पण काही अंक उपलब्ध नाही आहेत.

'चांदोबा'चे अंक सचित्र आणि रंगीत असायचे. प्रत्येक पानावर एक तरी चित्र असायचंच. काही गोष्टी तर अगदी छोट्या, सुटसुटीत अर्धपानी असायच्या. म्हणजे अर्धं पान गोष्ट आणि उरलेलं अर्धं पान त्या गोष्टीबद्दलचं चित्र. मोठ्या गोष्टींतही भरपूर चित्रं असायची. चित्रांवर दक्षिण भारतीय छाप असायची. जादुगार बी. एन्. सरकार यांच्या, जादूशी निगडीत कथा 'चांदोबा'मध्ये वाचल्या होत्या. 'रामायण', 'महाभारत' आणि इतर पौराणिक कथांच्या आणि इतरही काही कथांच्या मालिका असायच्या. त्यामुळे पुढचा अंक वाचायची उत्सुकता लागून रहायची. बी. नागी रेड्डी यांच्या चित्रपटांच्या कथाही चित्रकथा (comic) स्वरुपात असायच्या. मला आठवणारी एक चित्रकथा म्हणजे 'यही है जिंदगी'.

'चांदोबा'तील सर्वांत लोकप्रिय गोष्ट म्हणजे 'विक्रम वेताळ' ! विक्रम वेताळाला झाडावरून काढून पाठीवर घेऊन चालत असताना वेताळ विक्रमाला एक गोष्ट सांगायचा, जिचा शेवट थोडा विचित्र/आश्चर्यकारक असायचा. मग वेताळ विक्रमाला विचारायचा की तो शेवट तसा का आहे आणि वर धमकी द्यायचा - "या प्रश्नाचं उत्तर माहीत असूनही तू ते सांगितलं नाहीस तर तुझ्या डोक्याची शंभर शकले होऊन तुझ्याच पायावर लोळू लागतील." मग बिचारा हुशार विक्रम बरोबर उत्तर द्यायचा आणि तो बोलल्यामुळे नियमभंग होऊन वेताळ उडून जाऊन परत झाडावर लटकायचा. विक्रम परत वेताळाला झाडावरून काढून पाठीवर टाकायचा... हा मामला महिनोन् महिने, वर्षानुवर्षं चालला होता. कोणी एखाद्या गोष्टीचा नाद सोडला नाही, तर 'विक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही' हे आमचं आवडतं वाक्य आम्ही अजूनही वापरतो.

लहानपणी एका मे महिन्याच्या सुट्टीत आम्ही एका काकांच्या गावी गेलो होतो. अगदी वीज देखील नसलेलं छोटंसं गाव होतं ते. तिथे बाहेर आणि घरात बहिणीबरोबर खेळता येणार होतं, पण तरीही इतक्या थंड-शांत गावात वेळ जाईल का हा प्रश्न थोड्या प्रमाणात पडलाच होता. पण त्या गावात, काकांच्या शेजाऱ्यांच्या घरात मराठी चांदोबाच्या पहिल्या अंकापासून त्या वेळच्या अंकापर्यंत सगळे अंक सहा-सहा एकत्र बाइंडिंग करून ठेवले होते. ते अंक पाहिले आणि अलिबाबाला गुहेतला खजिना पाहून काय वाटलं असेल त्याची पूर्ण कल्पना आली. मग काय, 'सखाराम गटणे'च्या दुप्पट वेगाने मी ते अंक वाचत सुटले. तरी, मुंबईला परत जायला निघेपर्यंत सगळे वाचून झाले नाहीत आणि तिथून पाय उचलेना !

'किशोर' मासिकामध्ये, जे प्रामुख्याने मुलांचे साहित्यिक होते त्यांचं साहित्य तर असायचंच पण जे प्रामुख्याने मोठ्या माणसांचे साहित्यिक होते त्यांचंदेखील मुलांसाठीचं साहित्य वाचायला मिळायचं. डॉ. सरोजिनी बाबर यांची गोष्ट दिसली की लगेच लक्षात यायचं की गावच्या भाषेत लिहिलेली गावाकडची गोष्ट असणार. इंदिरा संत यांच्या अक्कू-बक्कूबद्दलच्या कविता छान असायच्या. 'असे हे विलक्षण जग', 'शंकासमाधान', 'तुमचा सुभाषितसंग्रह वाढवा' अशी माहितीपर सदरे आणि इतरही माहितीपर लेख असायचे. 'चित्रबोध शब्दशोध' हे शब्दकोडं, किशोर-कॅमल रंगस्पर्धा, चार अक्षरी शब्दांचं अक्षरकोडं असायचं. 'रामू आणि शामू' ही एकपानी चित्रकथा (comic) असायची. पाठच्या कव्हरवर 'राम आणि श्याम'ची पॉपिन्सची जाहिरात रंगीत चित्रकथेच्या स्वरुपात असायची. अनुक्रमणिकेच्या पानावरही चित्र असायचं. जुलै, ऑगस्टसारख्या पावसाळ्याच्या महिन्यांत अनुक्रमणिकेच्या पानावर बरीच माणसं पावसात छत्री उघडून आहेत असं चित्र असायचं.

'किशोर'च्या दिवाळी अंकात तर मनोरंजनाची मेजवानीच असायची. नेहमीपेक्षा जास्त गोष्टी, लेख,

कविता असायच्या. एखादी चित्रकथा असायची, एखादी एकांकिका असायची - त्यांचं कितीतरी अप्रूप वाटायचं. विविध क्षेत्रांतील सुप्रसिध्द व्यक्तींच्या लेखांचं एखादं सदर असायचं. त्याला काहीतरी सूत्र असायचं. मला बऱ्यापैकी आठवणारं सदर म्हणजे (बरोबर ४० वर्षांपूर्वीचं) नोव्हेंबर १९७८च्या दिवाळी अंकातलं 'बालपणीचा काळ सुखाचा'. यात पु. ल. देशपांडे, सुनिल गावस्कर, डॉ. श्रीराम लागू, जयवंत दळवी, मु. शं. किर्लोस्कर यांचे त्यांच्या बालपणातील आठवणींचे लेख होते. दिवाळी अंकांमध्ये मुलांसाठी निबंध स्पर्धा असायची. नोव्हेंबर १९७८च्याच दिवाळी अंकात 'बालपणच चांगले' किवा 'नको हे बालपण' ह्या विषयावर निबंध स्पर्धा होती. एक-दोन महिने आधीपासूनच दिवाळी अंकात काय असेल याची सूचना दिली जायची. त्यामुळे कधी एकदा दिवाळी येते आणि हा मनोरंजाने खच्चून भरलेला दिवाळी अंक वाचायला मिळतो असं व्हायचं.

एका दिवाळीच्या सुट्टीत आई-बाबा, मी आणि बहीण आत्याकडे गावाला गेलो होतो. जायच्या आधीपर्यंत 'किशोर' दिवाळी अंक निघाला नव्हता आणि त्यामुळे पोस्टाने घरी आला नव्हता. आत्याच्या घरी तिच्या कुटुंबियांबरोबर, आजूबाजूच्या नवीन मैत्रिणींबरोबर दिवाळीचा पुरेपूर आनंद उपभोगताना देखील 'आता मुंबईत घरी किशोर आला असेल' हा विचार डोक्यातून जात नव्हता. तेवढ्यात नेमकं आत्याच्या यजमानांना कामानिमित्त मुंबईला जावं लागलं. तिथे ते आमच्या घरी गेले आणि घरी असलेल्या आजी-आत्यांनी आठवणीने त्यांच्याबरोबर माझ्यासाठी 'किशोर'चा दिवाळी अंक पाठवून दिला. तो त्यांनी गावाला आणून मला दिल्यावर त्या बालवयात जो काही आनंद झाला होता त्याचं वर्णनच करता येणार नाही. आता मी मुद्दामहून तो दिवाळी अंक ऑनलाईन पाहिला, तर ते मुखपृष्ठ, बऱ्याच गोष्टी आणि त्या गोष्टींमधली चित्रं देखील चटकन आठवली. विशेषत: भा. रा. भागवतांची गोष्ट 'हावरट हेमा' आणि शांता शेळकेंची गोष्ट 'सावली'.

आणखी काही अंक म्हणजे 'बालवाडी', ‘कुमार’, ‘आनंद’ आणि ‘फुलबाग’. 'बालवाडी'चं एक वैशिष्ट्य मला आठवतं की अ ची बाराखडी ‘अ आ अि अी अु अू अे अै...’ अशी लिहिलेली असायची. म्हणजे 'आअी', ‘अिकडे’, ‘अुगाच’, 'अेकटा', ‘अैकले’ असे शब्द असायचे. 'बालवाडी'च्याच अंकांत अंजू नावाच्या मुलीबद्दलच्या छान गोष्टी असायच्या, इटकू-पिटकू (अिटकू-पिटकू) या उंदरांच्या जोडगोळीच्या गोष्टी असायच्या, रावळगाव टॉफीच्या जाहिराती असयच्या. ‘कुमार’ मासिकही छान होतं. त्यातल्या तिरसिंगराव पहिलवानांबद्दलच्या गोष्टी गंमतीशीर असायच्या. मला वाटतं फास्टर फेणेच्या गोष्टीही या मासिकांमध्ये असायच्या. ‘आनंद’ आणि ‘फुलबाग’ देखील आम्ही आवडीने वाचायचो. ‘चंपक’ नावाचं मासिक सुध्दा आठवतं. तो अंक रंगीबेरंगी असायचा. पानं पण रंगीत असायची. शिवाय प्रत्येक पानावर चित्रं असायची. ‘चीकू’ नावाची एक चित्रकथा (cartoon/comic) असायची.

‘बिरबल’ म्हणून एक अंक देखील मी ३-४ वर्षं वाचला होता. त्या प्रकाशनाचे तीन अंक होते - ‘बिरबल’, ‘क्रीडांगण’ आणि ‘टारझन’. एका वर्षी ‘बिरबल’च्या दिवाळी अंकात कोड्यांची स्पर्धा होती. ८ कोडी सोडवायची होती. आठही कोडी बरोबर सोडवणाऱ्याला पुढचं वर्षभर तिन्ही अंक बक्षीस म्हणून मिळणार होते, ७ बरोबर येणाऱ्यांना कोणतेही दोन आणि ६ बरोबर सोडवणाऱ्यांना कोणताही एक अंक. मला मुळात सातच सोडवता आली, त्यातलं एक चुकलं, पण तरीही सहा बरोबर आल्यामुळे ‘बिरबल’चे अंक एक वर्षभर बक्षीस मिळाले होते.

चाळीस वर्षांपूर्वीच्या आठवणी निघाल्या आणि एकापाठोपाठ एक उलगडतच गेल्या. त्या काळी ’वाचाल तर वाचाल’ हा सुविचार लहान मुलांच्या मनावर बिंबवला जायचा. शिवाय मनोरंजनाची इतर साधनंही फारशी उपलब्ध नव्हती. त्यामुळे बऱ्याच मुलांना थोडीफार तरी वाचनाची आवड होतीच. अलिकडच्या कंप्युटर, इंटरनेट, गॅजेट्सच्या जमान्यातही काही लहान मुलं आवडीने पुस्तकं वाचताना दिसतात तेव्हा बरं वाटतं. तरुण पिढी वाचत असली तर जास्त करून ई-पुस्तकं वाचताना दिसते. तेही ठीक आहे. लहानपणी मी ’किशोर’मध्येच एक विज्ञानकथा वाचली होती की भविष्यात सगळी पुस्तकं कंप्युटरवरच असणार. ते वाचून तेव्हा मला गंमत वाटली होती की असं कधी होईल का ? आणि जवळजवळ चाळीस वर्षांनी तीच गोष्ट मी कंप्युटरवरच वाचली ! अजून चाळीस वर्षांनी पुस्तकं कुठल्या स्वरुपात असतील कोण जाणे, पण कुठल्या न कुठल्या स्वरुपात चांगलं लेखन होत राहील आणि ते आवडीने वाचलंही जाईल अशी आशा करूया.

**- नीता नाबर**

(पूर्वप्रसिध्दी : ’रंगदीप’ २०१८)